नियमित फौजदारी खटला क्र. २०८/२०१३

निशाणी क्र. १५

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३

**नाव – सोनाबाई प्रकाश सावळे**

**वय–**४० वर्ष **व्यवसाय–** गृहिणी

**पत्ता–** स.नं. ३१४, वैदवाडी, हडपसर, पुणे.

**सरतपास शपथेवर सुरु**

**अभियोगपक्षातर्फे सुविज्ञ सरकारी अभियोक्ता श्री.जी.बी.सरवदे यांच्यामार्फत –**

सावकार माझे दिर आहेत. दिलीप माझा मुलगा आहे. आरोपी नातेवाईक आहेत. त्यामुळे त्यांना ओळखते. घटना कधी, कोठे, काय घडली होती ते माहित नाही. घटनेसंदर्भात पोलीसांनी चौकशी करुन जबाब घेतला नव्हता.

२. दिनांक १४/१०/२०१३ रोजी रात्री १०.१५ वाजण्याच्या सुमारास स.नं.३१५/३१७ पेट्रोलपंपाच्या पाठीमागे, भराडी चाळ, वैदवाडी, हडपसर येथे आरोपींनी दिलीप आणि सावकार यांना मारहाण व शिवीगाळ, मला त्यांनी शिवीगाळ केली अशी घटना घडली होती की नव्हती ते माहित नाही.

**(साक्षीदार पूर्वीच्या कथनांशी विसंगत विधाने करीत असल्याने त्यांना सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागण्यात आली. काही प्रमाणात विसंगत विधाने दिसून आल्याने परवानगी देण्यात येते.)**

३. दिनांक १४/१०/२०१३ रोजी रात्री १०.१५ वाजण्याच्या सुमारास स.नं.३१५/३१७ पेट्रोलपंपाच्या पाठीमागे, भराडी चाळ, वैदवाडी, हडपसर येथे आरोपींनी दिलीप आणि सावकार यांना मारहाण व शिवीगाळ, मला त्यांनी शिवीगाळ केली अशी घटना घडली होती ते माहित नाही. आरोपी क्र.१ दिपकने पूर्वीचा राग मनात धरुन वाईट वाईट शिवीगाळ केली होती की नाही ते माहित नाही. दिर आरोपीला घरी पाठवत असताना त्याने माझ्या मुलाच्या डोक्यात कोणत्या तरी धारधार शस्त्राने मारुन जखमी केली होती किंवा कसे ते माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे दिर दोन्ही हातांनी हत्यार धरत असतांना ते ओढले गेल्यामुळे त्यांना दुखापत झाली होती की नव्हती ते माहिती नाही. आरोपी क्र.२ने

घराजवळ येवून आम्हाला शिवीगाळ केली की नाही, आम्हाला मारहाण केली होती की नव्हती ते माहित नाही. आरोपी क्र.३ मालाबाईने आम्हाला शिवीगाळ केली की नाही, तिने जमीनीवर पडलेली वीट उचलून माझ्या मुलाला मारुन जखमी केली होते किंवा नव्हते ते माहित नाही. त्या गुन्ह्यामध्ये आम्ही तिघेही गंभीर जखमी झालो होतो किंवा नाही ते माहित नाही.

४. हडपसर पोलीस ठाण्यात जावून दिराने फिर्याद दिली होती की नव्हती ते माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. आता मला दाखवण्यात आलेला अवतरण चिन्हांकित भाग ड मधील मजकूर खरा आहे की नाही ते माहित नाही. पोलीसांशी वैर नाही. त्यांनी तसे का लिहिले ते माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी नातेवाईक असल्यामुळे त्यांना मदत होण्यासाठी, शिक्षा होवू नये म्हणून खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे सुविज्ञ विधिज्ञ श्रीमती पी.बी. धानोरकर यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Kawade
11/8/26

दिनांक :११/०८/२०२६

**(योगेंद्र सुरेंद्र कवडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे